10 AUG 2021
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्षाचे प्रवेश सुरू

## ऑनलाईन प्रक्रिया : विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा आजपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेतील प्रथम वर्षाच्या (फर्स्ट ईअर) प्रवेशासाठी कोल्हापुरातील महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या नावनोंदणीच्या प्रक्रियेचा सोमवारपासून प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा आज, मंगळवारपासून ऑनलाईन पद्धतीने सुरू होणार आहेत.

गेल्या आठवड्यात बारावीचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला. विद्यार्थ्यांना गुणपत्रिका कधी वितरित केल्या जाणार त्याची तारीख अद्याप राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेली नाही. गुणपत्रिका मिळेपर्यंत फर्स्ट ईअरच्या विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी नावनोंदणी करून घेण्याचा निर्णय महाविद्यालयांनी घेतला आहे. त्यानुसार विवेकानंद महाविद्यालय, गोखले कॉलेज, कमला कॉलेज, महावीर महाविद्यालयांमध्ये सोमवारपासून नावनोंदणीची प्रक्रिया सुरू झाली. नोंदणीसाठी या महाविद्यालयांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन पर्याय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिला आहे. न्यू कॉलेजमध्ये आज, मंगळवारपासून नोंदणीची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. दरम्यान, विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांचा प्रारंभ आज होणार आहे. पहिल्या टप्प्यात बी. एस्सी, बी. कॉम. अभ्यासक्रमाच्या भाग तीनमधील सत्र पाच आणि सहाच्या परीक्षा होतील. एम. ए., एम. एस्सी. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा उद्या, बुधवारपासून सुरू होणार आहेत. ऑनलाईन पद्धतीने सकाळी साडेदहा, दुपारी साडेबारा, अडीच आणि साडेचार या चार सत्रांमध्ये परीक्षा होणार आहेत.

### परीक्षार्थींवर 'वेबकॅम'ची नजर

परीक्षा व मूल्यमापन मंडळाने या उन्हाळी सत्रातील ऑनलाईन परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना विविध सूचना केल्या आहेत. त्यात विद्यार्थ्यांनी त्यांची ओळख होण्यासाठी आधार कार्ड, पॅनकार्ड अथवा महाविद्यालयाच्या ओळखपत्रावर छायाचित्र सादर करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचा चेहरा वेबकॅम अथवा मोबाईलच्या कॅमेरामध्ये दाखवावा. त्याची आणि ओळखपत्रावरील छायाचित्राची पडताळणी झाल्यानंतरच परीक्षा सुरू होईल. परीक्षा सुरू असताना परीक्षार्थींकडून गैरप्रकार होत नाही याची तपासणी करण्यासाठी वेबकॅमद्वारे सतत छायाचित्रे घेतली जातील. गैरप्रकार आढळल्यास संबंधित परीक्षार्थींची परीक्षा त्याठिकाणी त्वरित स्थगित केली जाणार आहे.



10 AUG 2021 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## E-Tender Notice No. 715

Sealed percentage rate e-tenders are invited from the P.W.D. registered contractors in appropriate class for Civil works by the Registrar, Shivaji University, Kolhapur. Relevant Tender documents are available on University's web-site **http://unishivaji.sets.co.in.** Interested parties should submit online tender accordingly by getting their firm's name registered with above said URL.
**Last date of Tender submission is 21/08/2021 upto 05:30 pm.**

| Sr. No. | Name of Work | Estimated Cost in Rs | E. M. D in Rs. | Period | Cost of Tender in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Repairs and reconstruction of compound wall near athletic ground. | 4,27,035/- | 5,000/- | 1 Month | 500/- |

**Note:-** 1) E.M.D. should be paid by Demand Draft Payable to Finance and Account Officer, Shivaji University, Kolhapur. 2) The corrigendum if any for above notice will not be published in newspaper. If there is any corrigendum to this notice it will be published on University's web-site http://unishivaji.sets.co.in only and it will be binding on the contractor. 3) Right to accept or reject any or all the tenders is reserved by the University without assigning any reason.

Su/Engg/Civil/
Date:-10/08/2021

**Dr. Vilas D. Nandavadekar**
Registrar

10 AUG 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एज्यु-दिशा प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**विद्यार्थ्यांना करिअर निवडीसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळावे तसेच करिअर करण्यासाठी आवश्यक अभ्यासक्रम उपलब्ध असणाऱ्या राज्यातील नामवंत शैक्षणिक संस्थांची ओळख व्हावी, यासाठी संजय घोडावत युनिव्हर्सिटी प्रस्तुत 'पुढारी' एज्यु-दिशा ऑनलाईन २०२१ हे शैक्षणिक प्रदर्शन आणि वेबिनार गेल्या तीन दिवसांपासून सुरू आहे. त्याला राज्यातील विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी उदंड प्रतिसाद दिला. लोकाग्रहास्तव एक दिवस कालावधी वाढविलेल्या या प्रदर्शनाचा आज मंगळवारी (दि. १०) प्रख्यात लेखक अच्युत गोडबोले आणि डॉ. पी. एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाने समारोप होणार आहे.**

दहावी-बारावीनंतर नेमके कोणते करिअर निवडायचे आणि त्यासाठी मार्गदर्शन कोण करणार, या संभ्रमात असलेल्या विद्यार्थी आणि पालकांसाठी 'पुढारी' एज्यु-दिशा ऑनलाईन २०२१ हे शैक्षणिक प्रदर्शन आणि वेबिनार दि. ७ ते १० ऑगस्टदरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यात आले आहे. याचा राज्याच्या कानाकोपऱ्यातील हजारो विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

कोरोनाचे निर्बंध अद्याप शिथिल झाले नसल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांना घराबाहेर पडणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक शैक्षणिक भवितव्याबाबत अस्वस्थ झाले आहेत. अशा परिस्थितीत एज्यु-दिशा प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घरबसल्या कोणतेही शुल्क न खर्च करता राज्यातील नामवंत शैक्षणिक संस्थांची ओळख तर झालीच. त्याचबरोबर विविध तज्ज्ञांकडून करिअरनिश्चितीचा मार्गदेखील सापडला.

प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशी लेखक अरविंद जगताप यांनी 'कलेमधून पैसे मिळतात का', डॉ. दिलीप सातभाई यांनी 'कॉमर्समधील करिअरच्या संधी', तर दिलीप ओक यांनी 'परदेशातील शिक्षणाच्या संधी' या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर आज शेवटच्या दिवशी प्रख्यात लेखक व आय.टी.तज्ज्ञ अच्युत गोडबोले हे 'उद्याचे तंत्रज्ञान' आणि शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील हे 'नॅनो टेक्नॉलॉजी : नव्या युगाचे तंत्रज्ञान' या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. प्रदर्शनाचे सहयोगी प्रायोजक एमआयटी-एडीटी युनिव्हर्सिटी पुणे, तर सहप्रायोजक डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ पुणे व पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट पुणे हे आहेत. प्रदर्शनाच्या माध्यमातून शैक्षणिक करिअरचा महत्त्वाचा प्रश्न सुटत असल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांनी प्रदर्शनाचा कालावधी वाढविण्याची मागणी केली होती. त्यांच्या आग्रहास्तव एक दिवस कालावधी वाढविण्यात आला आहे. त्यामुळे आज शेवटच्या दिवशी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात सहभागी होत आपल्या करिअरचा मार्ग निश्चित करणे गरजेचे आहे.

- **प्रख्यात लेखक अच्युत गोडबोले आणि डॉ. पी. एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाने आज प्रदर्शनाचा समारोप**
- **हजारो विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन आणि नामवंत शैक्षणिक संस्थांची झाली ओळख**

SANJAY GHODAWAT UNIVERSITY
Presents
Edu Disha
Powered by
MIT-ADT UNIVERSITY
Co-Sponsor
DPU

## असे पाहता येईल एज्यु-दिशा प्रदर्शन

विनामूल्य नोंदणी करण्यासाठी हा QR Code स्कॅन करा.

प्रदर्शनात दरवर्षीप्रमाणे निरनिराळ्या विद्या शाखांची ३५ हून अधिक दालने आहेत. www.pudhariexpo.com या वेबसाईटवर क्लिक केल्यानंतर प्रदर्शनात सहभागी होता येणार आहे. यासाठी रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. रजिस्ट्रेशन केल्यानंतर प्रदर्शन हॉल व लेक्चर हॉल, असे दोन पर्याय असतील. यात प्रदर्शन हॉलमध्ये शैक्षणिक संस्थांचे स्टॉल दिसतील. त्यामध्ये विविध शिक्षण संस्थांची माहिती, व्हिडीओ तसेच इतर माहिती मिळेल. त्याचबरोबर संबंधित शिक्षण संस्थेस ऑडिओ व व्हिडीओ कॉल करता येणार आहे.

## पुढारी यूट्यूब चॅनेलवर पाहा तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने...

लॉ अँड ऑर्डरचे जॉईंट सी. पी. विश्वास नांगरे-पाटील, संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण पाटील, डीन ऑफ इंडस्ट्री इन्स्टिट्यूट इंटरॅक्शनचे शीतलकुमार रवंदळे, आयटी प्रोफेशनल दीपक शिकारपूर, माजी सनदी अधिकारी डॉ. इंद्रजित देशमुख, इनोव्हेशन ऑफिसर हर्षद ठाकूर, लेखक अरविंद जगताप, डॉ. दिलीप सातभाई, दिलीप ओक यांनी वेगवेगळ्या विषयांवर 'पुढारी' एज्यु-दिशा ऑनलाईन वेबिनारमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. संबंधित तज्ज्ञांची ही मार्गदर्शनपर व्याख्याने 'पुढारी ऑनलाईन' या यूट्यूब चॅनेलवर सर्वांनाच पाहता येणार आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना काही कारणास्तव 'पुढारी' एज्यु-दिशा ऑनलाईन वेबिनारमध्ये सहभागी होता आले नाही अशा विद्यार्थ्यांना यूट्यूब चॅनेलवर तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने पाहून आपल्या करिअरचा मार्ग निवडता येणार आहे.

**एज्यु-दिशा व्याख्यानांचे वेळापत्रक**

| क्र. | व्याख्याते | विषय | तारीख | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | **अच्युत गोडबोले** (प्रख्यात लेखक व आय.टी. तज्ज्ञ) | उद्याचे तंत्रज्ञान | १० ऑगस्ट | स. ११.०० वा. |
| २ | **डॉ. पी. एस. पाटील** (प्र. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ) | नॅनो टेक्नॉलॉजी : नव्या युगाचे तंत्रज्ञान | १० ऑगस्ट | दु. १.०० वा. |

तरुण भारत

# परीक्षा आर्टीफिशअलच्या निगराणीखाली होणार



- शिवाजी विद्यापीठ प्रशासनाची माहिती
- विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च–एप्रिलच्या काही परीक्षा सुरु आहेत तर काही परीक्षा १८ ऑगस्टपासून सुरू होणार आहेत. या परीक्षा संगणक प्रणालीच्या माध्यमातून आर्टीफिशअल इंटिलिजन्स ॲपच्या निगराणीखाली होणार आहेत, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठ प्रशासनाला राज्य शासनाकडून परीक्षा सुरळीत व परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यासंदर्भात निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे सध्याच्या विद्यापीठ परीक्षा पध्दतीत बदल करून परीक्षेची कार्यपद्धत बदलली आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षा देताना कॅमेऱ्यासमोर बसायचे आहे. विद्यापीठ संकेतस्थळावरून विद्यार्थ्यांच्यावर लक्ष ठेवले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी विद्यापीठाने माहिती पुस्तिका तयार केली आहे. ही माहिती पुस्तिका विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. परीक्षा कशी द्यायची यासंदर्भातील प्रशिक्षणाचा व्हिडीओदेखील विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचा गोंधळ टाळण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना मॉकटेस्ट देण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी विद्यार्थ्यांनी मॉकटेस्ट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच युजर नेम, गोपनीय पासवर्ड विद्यार्थ्यांच्या ईमेलवर व मोबाईलवर एसएमएसद्वारे पाठवण्यात आला आहे.

1 0 AUG 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी २० टक्के वाढीव जागा

## शिवाजी विद्यापीठ कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर : सर्व महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया आजपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया महाविद्यालय पातळीवर राबवण्यात येणार आहे. सर्वच महाविद्यालयांवर ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने ही प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. यंदा बारावी उत्तीर्णतेचे प्रमाण वाढले असले तरी तिन्ही जिल्ह्यातील जवळपास २९० महाविद्यालयांना आवश्यकतेनुसार २० टक्के जागा वाढवून देण्यात येणार आहेत. परंतु एकाच परिसरात दोन महाविद्यालये असतील तर दोन्ही महाविद्यालयातील प्रवेश क्षमता पूर्ण झाली तरच अतिरिक्त तुकडी देण्याचा विचार केला जाईल, अशी माहिती कुलसचिव



डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

बारावीचा निकाल ९९ टक्के लागल्याने पदवी प्रथम वर्षाला प्रवेशासाठी मोठी स्पर्धा होईल, असे म्हटले जात आहे. परंतु बारावी उत्तीर्ण झालेले काही विद्यार्थी मेडिकल, कृषी, इंजिनिअरिंग, बी. टेक. एल. एल. बी. अशा अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात. त्यामुळे बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्यांच्या संख्येत अलीकडे घट होत आहे. त्यामुळे नावाजलेली महाविद्यालये सोडली तर इतर महाविद्यालयात जागा शिल्लक राहतात. यंदा उत्तीर्णतेची संख्या जास्त असली तरी प्रत्येक महाविद्यालयाच्या जागा पूर्ण भरल्याशिवाय कोणत्याही महाविद्यालयाला अतिरिक्त जागा किंवा तुकडी दिली जाणार नाही. एकाच परिसरात दोन महाविद्यालयांपैकी एका महाविद्यालयाने अतिरिक्त जागा किंवा तुकडीची मागणी केल्यास त्याच परिसरातील दुसऱ्या महाविद्यालयाचे नो ऑब्जेक्शन सर्टीफिकेट असल्याशिवाय अतिरिक्त तुकडी दिली जाणार नाही. त्यामुळे एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये याची दखल घेत महाविद्यालयांनी प्रवेशाचे नियोजन करावे, अशा सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या असल्याचे नांदवडेकर यांनी सांगितले.

### न्यू कॉलेजची प्रवेश प्रक्रिया आजपासून

न्यू कॉलेजमधील बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. अभ्यासक्रमाच्या नावनोंदणीला मंगळवार, १० ऑगस्टपासून सुरूवात होणार आहे. ही नावनोंदणी १८ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार असून २० ऑगस्ट रोजी गुणवत्ता यादी लावली जाणार आहे. २२ ऑगस्टपासून गुणवत्ता यादीनुसार प्रवेश दिला जाणार आहे. कोरोनाच्या नियमांचे पालन करीत टप्प्याटप्प्याने प्रवेश दिला जाणार आहे.